# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ५८

विभाग :- आरोग्य विभाग (स्मशानभूमी)
दिनांक :- २३/०४/२०२१

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडाचा पुरवठा करणेकरिता विशेष अतितातडीची बाब म्हणून वनविकास महामंडळ, महाराष्ट्र लि. यांचेकडून विना निविदा खरेदी करणेस होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत एकूण ८५ स्मशानभूमी आहेत. सदर स्मशानभूमीत प्रेत दहनाकरिता जळाऊ लाकडे महानगरपालिकेमार्फत मोफत पुरविण्यात येत आहेत.

माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वनविकास महामंडळाकडून जळाऊ लाकडांचा पुरवठा अनियमित होत असल्याने स्मशानात प्रत दहनाकरिता जळाऊ लाकडाची निकड लक्षात घेऊन मे. श्री शंकर टिंबर ट्रेडींग यांचे ई-निविदेस सुधारित मंजूरी घेऊन मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ३३२, दि. १३/०९/२०१९ चे मान्यतेप्रमाणे रक्कम रुपये १० लक्ष रक्कमेच्या किंमतीएवढी जळाऊ लाकडे पुरवठा होणे बाकी असल्याने मा. आयुक्त यांचे दि. २७/०३/२०२० रोजीचे मान्यतेने पुढील तीन महिन्यांकरिता या कार्यालयाचे आदेश क्र. व.वि.श.म./अ.आ.१/२३२/१९-२०, दि. ३१/०३/२०२० अन्वये १२०० टन जळाऊ लाकूड पुरवठा करणेचे आदेश देण्यात आले आहेत. दि. ०७/०४/२०२१ अन्वये लाकूड पुरविण्यांचा आदेश देण्यात आला आहे व त्यानुसार पुरवठादाराने सुमारे १९० टन जळाऊ लाकडाचा पुरवठा सुध्दा केला आहे.

तथापि मागील काही दिवसांपासून कोव्हिड रुग्णांच्या मृत्युचे प्रमाण वाढले असल्याने त्यांच्या अंत्यविधी करीता जळाऊ लाकडाच्या मागणीमध्ये अचानक मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. महानगरपालिकेचे नियमीत पुरवठादार मे. श्री. शंकर टिंबर ट्रेडिंग यांचेतर्फे सद्य:स्थितीत होणारा पुरवठा अपुरा पडत असल्यामुळे जळाऊ लाकडाचा मोठ्या प्रमाणावर

तुटवडा निर्माण झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी इकडील पत्र क्र. वविशम / आरोग्य /६०/२१-२२ दि. २०/०४/२०२१ अन्वये दिलेल्या पत्राद्वारे त्यांचेकडील उपलब्ध जळाऊ लाकडांच्या साठ्याबाबत माहिती मागविली असता पत्र जा. क्र. विव्य/प्रविठा/आस्था/१२५/२०२०-२१ दि. २१/०४/२०२१ अन्वये त्यांचे कडे १६०५.७८० घ.मी. जळाऊ लाकड उपलब्ध असून त्यांची एकूण किंमत रु. २४,५३,८५७/- व वाहतुक परवाना फी रु. ११८/- प्रति वाहन असे कळविण्यात आले आहे.

तरी कोव्हिड व अन्य कारणामुळे मृतकांची संख्या वाढलेली असल्यामुळे पुरवठादाराकडील व नियमीत पुरवठा अपुरा पडत असल्यामुळे निर्माण झालेल्या आणिबाणीच्या परिस्थितीत विशेषबाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करणे व अनुसूचि ड मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये वनविकास महामंडळ, महाराष्ट्र लि. यांचेशी संविदा करणेस प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-**

**वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडाचा पुरवठा करणेकरिता आणिबाणीच्या परिस्थितीत विशेषबाब म्हणून मनपा अधिनियम १९४९ क्र. ६७(३)(क) अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करणे व परिशिष्ट ५(२)(२) अन्वये वनविकास महामंडळ, महाराष्ट्र लि. यांचेशी संविदा करणेस व त्याकामी होणाऱ्या रक्कम रु.२४,५३,८५७.०० + वाहन परवाना फी एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.**

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ६० विभाग :- बांधकाम

दिनांक :२२/०४/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली बस डेपो येथे उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर फेंसिंग व प्रोफाईल शीट बसविणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिलका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली येथे बस डेपोचे विकसीत करण्यात आलेला आहे. सदर बस डेपोच्या बाजूस तलाव उद्यान असून उद्यानात खेळण्यास येणारी मुले कंपाऊंडवर चढून डेपोमध्ये प्रवेश करीत आहेत. डेपोमध्ये वर्कशॉप तयार करण्यात येत असून बस वाहानांची ये-जा सुरु असल्याने सदर ठिकाणी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी तातडीने सुरक्षिततेसाठी उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर व फेंसिंग व प्रोफाईल शीट बसविणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रु. ५,९१,६१९/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली बस डेपो येथे उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर फेंसिंग व प्रोफाईल शीट बसविणे कामी अंदाजपत्रकीय रु. ५,९१,६१९/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ६७

दिनांक :२२/०४/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलच्या कन्वेअरबेल्टसाठी कॉक्रीट बेस तयार करणे

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. ८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड मधल्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने नव्याने यंत्र सामुग्री पुरविण्यात आलेली आहे, यात डंम्पींग ग्राऊंड मध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या विभागजनासाठी ट्रॉमील्स मशीनचा समावेश आहे. सदर ठिकाणी नव्याने पुरविण्यात आलेली ट्रॉमीलचे कन्वेअरबेल्ट ठेवण्याकरीता अस्तित्वातील जुना कॉंक्रीट बेस अपूरा पडत असल्याने नव्याने कॉंक्रीट बेस तातडीने तयार करणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रु. २२,९५,८६२/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलच्या कन्वेअरबेल्टसाठी कॉक्रीट बेस तयार करणे कामी अंदाजपत्रकीय रु. २२,९५,८६२/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६२

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २२/०४/ 2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली बस डेपो येथे उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर फेसिंग व प्रोफाईल शीट बसविणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिलका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली येथे बस डेपो विकसीत करण्यात आलेला आहे. सदर बस डेपोच्या बाजूस तलाव उद्यान असून उद्यानात खेळण्यास येणारी मुले कंपाऊंडवर चढून डेपोमध्ये प्रवेश करीत आहेत. डेपोमध्ये वर्कशॉप तयार करण्यात येत असून बस वाहानांची ये-जा सुरु असल्याने सदर ठिकाणी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर ठिकाणी सुरक्षिततेसाठी उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर व फेसिंग व प्रोफाईल शीट बसविण्याचे काम तातडीने करणे आवश्यक आहे, सदर ठिकाणी जागेची पाहणी करून रक्कम रू. ५,९१,६१९/-चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करून सदर कामी ठराव क्र. ------------ नुसार दि. -------------------- रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तसेच मा. कार्यकारी अभियंता यांनी ---- ----------------- तांत्रीक मंजुरी दिली आहे.

सबब उपरोक्त ठिकाणी कंपाऊंडवर वायर फेसिंग व प्रोफाईल शीट बसविणेचे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. श्री. कॉन रा.- वसई (पु) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यास व कायदिश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली बस डेपो येथे उद्यानाच्या बाजूच्या कंपाऊंडवर वायर फेसिंग व प्रोफाईल शीट बसविणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. श्री. कॉन रा.- वसई (प) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यास व कायदिश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग : बांधकाम विभाग
प्रशासकीय ठराव क्र. ६३
दिनांक : २२/०५/ 2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलच्या कन्वेअरबेल्टसाठी कॉक्रीट बेस तयार करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. ८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड मधल्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने नव्याने यंत्र सामुग्री पुरविण्यात आलेली आहे, यात डंम्पींग ग्राऊंड मध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या विभागजनासाठी ट्रॉमील्स मशीनचा समावेश आहे.

सदर ठिकाणी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलचे कन्वेअरबेल्ट ठेवण्याकरीता अस्तित्वातील जुना काँक्रीट बेस अपूरा पडत असल्याने नव्याने काँक्रीट बेस तातडीने तयार करणे आवश्यक आहे, सदर ठिकाणी जागेची पाहणी करून रक्कम रू. २२,९५,८६२/- चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे.

सबब, उपरोक्त ठिकाणी ट्रॉमील्स ठेवण्याकरीता नव्याने काँक्रीट बेस तयार करणेचे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. हमीद जे. शेख रा.- वसई (प) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कायदिश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलच्या कन्वेअरबेल्टसाठी कॉक्रीट बेस तयार करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. हमीद जे. शेख रा.- वसई (प) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कायदिश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ६४

विभाग :-घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :- २२/०४/२०२१

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्ते, रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी प्रस्तावित केलेल्या ५ मैला सेप्टीक टँकरसाठी ५ ट्रॅक्टर खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील प्राप्त निविदेकार **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** यांच्यासोबत संविदा करुन कार्यादेश देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई या शहराच्या लगतचे शहर म्हणून उदयास आले आहे. मुंबई शहरात कामानिमित्त येणाऱ्या नोकरदारांनी राहण्यासाठी उत्तम शहर म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राला पसंती दिली आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार मनपाची लोकसंख्या १२,२२,३९० एवढी असून सद्यस्थितीत अंदाजे २० लक्ष एवढी लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे. लोकसंख्येच्या वाढीनुसार मनपा क्षेत्रात मोठया प्रमाणात रहिवाशी इमारती उभ्या झाल्या आहेत. मनपा क्षेत्रात एकूण ८,२४,२१८ मालमत्ता असून त्यातील ७,०२,२०२० एवढे निवासी व १,२२,०१६ एवढे वाणिज्य मालमत्ता आहेत. सदरील मालमतांमध्ये एकूण ८८,६६५ एवढे सेप्टीक टँक असून सेप्टींक टँक मध्ये साचलेला मैला मनुष्यबळ वापरुन स्वच्छ करणेस अधिनियम २०१३ (२०१२ चा २९) दि.०६ डिसेंबर २०१३ पासून लागू केला असून या अधिनियमाची अंमलबजावणी दि.१२ डिसेंबर २०१३ च्या भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे.

त्यानुसार सेप्टीक टँक स्वच्छ करणेकामी मनुष्यबळाचा वापर न करता शास्त्रोक्त व यंत्र सामुग्री वापरुन मनपा हद्दीतील सार्वजनीक शौचालये, सामुहीक शौचालये, झोपडपट्टीतील शौचालये, चाळी व

खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु सदरील मैला टँकर टाकी स्वरुपातील असून त्यासाठी ट्रॅक्टर वाहनाची आवश्यकता असल्याने सदरील मैला टँकर साठी ५ ट्रॅक्टर स्वतंत्ररित्या खरेदी करणे आवश्यक आहे. तरी ५ मैला टँकरसाठी ५ ट्रॅक्टर खरेदीसाठी दि.२९/०१/२०२१ रोजी १) दै.आमची मुंबई २) दै.नवाकाळ ३) दै.फ्रि प्रेस या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.२७/०१/२०२१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मान्यता प्राप्त Gem Portal वरुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदेच्या तांत्रिक बाबीच्या लखोटा क्र.१ मध्ये मध्ये **१)मे.महिन्द्रा ऍण्ड महिन्द्रा लिमिटेड, २) मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड, ३)मे.टॅफे मोटर्स ॲण्ड ट्रॅक्टर लिमिटेड, ४) मे.सीएनएच इंडस्ट्रीयल (इंडिया) प्रा.लिमिटेड, ५) मे.वीएसटी टिलर्स ट्रॅक्टर्स लिमिटेड** यांना पात्र धरुन दि.१२/०३/२०२१ रोजी मा.निविदा समितीने आर्थिक बाबीचा लखोटा क्र.२ उघडण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आर्थिक बाबीचा लखोटा क्र.२ मध्ये **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** हे एल-१ असून त्यांनी निविदेत प्रती ट्रॅक्टर **रक्कम रु.४,८५,०००/-** या प्रमाणे ५ ट्रॅक्टरसाठी **रक्कम रु.२४,२५,०००/- (अक्षरी रक्कम रु.चोवीस लक्ष पंचवीस हजार मात्र)** एवढा दर दिला आहे. परंतु सदरील दर दिनांक २४/०३/२०२१ रोजी निविदा समिती पुढे ठेवला असता निविदा समितीने निविदेत भरलेल्या दरात वाटाघाटी करणेस निर्णय दिला आहे. त्यानुसार वविशम/आरोग्य/५५८/२०२१ दि.०१/०४/२०२१ रोजी निविदेतील मंजूर वाटाघाटी करणेस पत्र देण्यात आले आहे. सदरील पत्राच्या अनुषंगाने **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** यांनी निविदेत भरलेल्या प्रती ट्रॅक्टर रक्कम **रु.४,८५,०००/-** व ५ ट्रॅक्टरसाठी **रक्कम रु.२४,२५,०००/-** एवढया दरातच पुरवठा करणार असल्याचे कळविले आहे. तसेच वाटाघाटी दरम्यान सदरील वाहनांसाठी लागणारी वाहनांची संपूर्ण मंजूरीचा (R.T.O. Passing) खर्च सदरील निविदेकार करणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुषंगाने **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** यांच्या ५ ट्रॅक्टरसाठी रक्कम रु.२४,२५,०००/- एवढया दरास मान्यता देणेकामी दि.१२/०४/२०२१ रोजी निविदा समिती पुढे ठेवला असता ५ ट्रॅक्टरसाठी **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** यांच्या **रक्कम रु.२४,२५,०००/-** + वाहतुक खर्च **(रु.११/- प्रती कि.मी.)** एवढया दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देण्यास मंजूरी दिली आहे.

आहे. त्यानुषंगाने **मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड** यांच्या सोबत करारनामा करण्यास व कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

<u>ठराव निर्णय :-</u>

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्ते, रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी प्रस्तावित केलेल्या ५ मैला सेप्टीक टँकरसाठी ५ ट्रॅक्टर महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त GEM portal वरुन बिड प्रिपेशन करुन मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील मंजूरी निविदेकार मे.इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेड या निविदेकारांच्या प्राप्त दरास मंजूरी देऊन सदरील निविदेकारासोबत संविदा करुन कार्यादेश देणेस मंजूरी देत आहे.**

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल -vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६५ | विभाग : आस्थापना (मु.)
दिनांक : २२/०४/२०२१

प्रस्तावाचा विषय :- कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर कार्यरत असलेले श्री. हर्षल पाटील यांना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अन्वये दि. १६/०१/२०१६ रोजी कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदासाठी मुलाखती घेऊन दि. ११/०२/२०१६ पासून सहा महिन्यांचे कालावधीसाठी श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा. महासभा, ठराव क्र. ४, दि. १९/०८/२०१६ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून दि. २०/०८/२०१६ रोजी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर पुन्हा मा. महासभा, ठराव क्र. १५, दि. ६/०३/२०१७ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून त्यांची दि. १७/०२/२०१७ पासून पुनर्नियुक्ती करण्यात आली. तसेच मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. १९१,दि. ३१/०७/२०१८ अन्वये श्री. पाटील यांना पुन:श्च मुदतवोढ देण्यात आली होती. तसेच संदर्भ ४ नुसार मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. २९९, दि. २३/१०/२०१८ रोजी पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व संदर्भ ५ नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री. हर्षल पाटील यांची दि. २५/१०/२०१९ रोजी मुदतवाढ संपलेली होती. दि. २६/१०/२०१९ ते दि. २५/०४/२०२० पर्यंत त्यांनी काम केले असल्याने संदर्भ क्र. ७ नुसार त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनास कार्योत्तर मान्यता देवून व दि. २७/०४/२०२० पासुन ते दि. २६/१०/२०२० पर्यंत सहा महिन्या करिता मुदतवाढ देण्यात आलेली होती.

दि. २५/१०/२०२० पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदतवाढ संपलेली होती . संदर्भ क्र. ९ नुसार श्री. पाटील यांनी पुन:श्च मुदतवाढ देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरुपात दि. २७/१०/२०२० रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन प्रशासकीय ठराव क्र. ३३३, दि. ६/०१/२०२१ नुसार दि. २८/१०/२०२० पासुन ते दि. २७/०४/२०२१ पर्यंत पुन:श्च मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची दि. २७/०४/२०२१ रोजी सहा महिन्याची मुदतवाढ संपणार असल्याने श्री. पाटील यांनी संदर्भ क्र. १२ च्या विनंतीनुसार पुढील सहा महिन्याची मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञ ( I. T.) विभागात कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) संगणक विभागातील कामाची निकड पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (३) अन्वये या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत - यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्या अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आयुक्तास मा. स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार आहे. तथापि सद्या प्रशासकीय कालावधी असल्याने मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

दि. २७/०४/२०२१ पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदतवाढ संपलेली आहे. दि. ३०/०३/२०२१ च्या अर्जान्वये श्री. पाटील यांनी पुन:श्च मुदतवाढ देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाकची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरुपात दि. २८/०४/२०२१ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन दि. २९/०४/२०२१ पासून दि. २८/१०/२०२१ पर्यंत पुन:श्च सहा महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांनी मागणी केल्यानुसार तसेच संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरुपात दि. २८/०४/२०२१ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन दि. २९/०४/२०२१ पासुन पुढील सहा महिन्यांचा कालावधीसाठी ठोक वेतनावर पुन:श्च मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर विचार विनीमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**ठराव/ निर्णय** :- संगणक विभागातील ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघूनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि. २७/०४/२०२१ रोजी संपली आहे. श्री. हर्षल पाटील यांना संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता एक दिवसाचा (दि. २८/०४/२०२१) तांत्रिक खंड देऊन दि. २९/०४/२०२१ पासून दि. २८/१०/२०२१ पर्यंत सहा महिन्याच्या कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास तसेच ठोक वेतनावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 66

**विभाग :** **बांधकाम विभाग**
**दिनांक :** 23 / 4 / **2021**

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 52 मधील सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र येथे पाईप् रेलींग व लोखंडी गेट बसविणे

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील सर्वोदय वसाहत येथे असलेले माता बाल संगोपन केंद्रामध्ये दररोज अनेक रूग्णांवर उपचार केले जातात. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी अनेक वाहनांची वर्दळ सुरू असते व तसेच रूग्णांसोबत येणाऱ्या लोकांची गर्दी होते. त्यामुळे तेथे ॲम्ब्युलन्सला ये-जा करणे शक्य होत नाही. तसेच सद्यस्थितीत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता सदर ठिकाणी लोंकांची गर्दी होणे हे अतिशय गंभीर आहे.

त्यामुळे सदर ठिकाणी लोखंडी गेट व पाईप रेलींग करणे आवश्यक आहे. जेणेकरून वाहनांची व लोकांची गर्दी होणार नाही व ॲम्ब्युलन्सला ये-जा करणे सोईचे होईल.

त्यानुसार सदर कामाचे रक्कम रू. 4,95,982/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| 1. | वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 52 मधील सर्वोदय वसाहत येथील माता बाल संगोपन केंद्र येथे पाईप् रेलींग व लोखंडी गेट बसविणे. | रू. 4,95,982/- |

या करीता वर नमुद करावयाच्या कामास बांधकाम संबंधित कामाचे सन 2019-2020 या वित्ती वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभगाच्या राज्य दरसुची नुसार आवश्यक कामाचे अंदाजपत्रक मयार करण्यात आले आहे.

**ठराव** - उपरोक्त् नमुद कामास रक्कम रू. 4,95,982/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

विभाग :-घनकचरा व्यवस्थापन

प्रशासकीय ठराव क्र. ६७

दिनांक :-२३/०६/२०२१

---

**विषय :-** कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष, मनपा दवाखाने, कंटमेंट झोन व मनपा कार्यालयामध्ये सॅनिटायझर फवारणी करणेकामी सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुनाशक खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** जगभरात कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाने थैमान घातले असून वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत मोठया प्रमाणात कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत आहे. तरी सदरील संसर्गजन्य रोगावर नियंत्राणासाठी मनपाने स्थापित केलेल्या विलगीरण कक्ष, दवाखाने, कंटमेंट झोन, मनपा कार्यालये इत्यादी ठिकाणी सोडियम हायपोक्लोरोईड या जंतुनाशकाची फवारणीसाठी मनपाच्या आस्थापनेवरील ४६ कायम सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत प्रभाग निहाय खालीलप्रमाणे सोडियम हायपोक्लोराईड १०% यांचा साठा उपलब्ध आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती | सोडियम हायपोक्लोराईड १०% चा शिल्लक साठा |
|---|---|---|
| १ | A | ६० लिटर |
| २ | B | १५० लिटर |
| ३ | C | निरंक |
| ४ | D | ८० लिटर |
| ५ | E | १४० लिटर |
| ६ | F | ४८० लिटर |
| ७ | G | निरंक |
| ८ | H | निरंक |
| ९ | I | ८० लिटर |
| एकुण शिल्लक साठा | | ९९० लिटर |

तरी सद्यस्थितीत कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात वाढत असल्याने मनपाच्या प्रभाग समिती निहाय सोडिय हायपोक्लोरोईड या जंतुनाशकाचा साठा ९९० एवढा शिल्लक आहे. वाढत्या रुग्णांमुळे कंटमेंट झोनची संख्याही मोठया प्रमाणात वाढत असल्याने सद्यस्थितीत सोडियम हायपोक्लोरोईड १०% चा प्रभाग निहायसाठा अपुरा असल्याने मनपा क्षेत्रातील कंटमेंट झोन व इतर ठिकाणी सोडियम हायपोक्लोरोईड १०% फवारणीसाठी मोठया प्रमाणात अडचणी येऊ शकतात. तरी सद्यस्थितीत वाढत्या कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळत असल्याने खालीलप्रमाणे सोडियम हायपोक्लोरोईड १०% ची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | जंतुनाशकाचे नाव | आवश्यक असणारे प्रमाणे | प्रति लीटर रक्कम रु. | १८% GST | १८% GST सह | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोडियम हायपोक्लोरोईड १०% | १२,००० ली. | रु.२०/- | रु.३.६०/- | रु.२३.६०/- | रु.२,८३,२००/- |

तरी वरीलप्रमाणे सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुनाशक खरेदीसाठी १८% GST सह रक्कम **रु.२,८३,२००/- (अक्षरी रक्कम रु.दोन लक्ष त्रयाऐंशी हजार दोनशे मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरील खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील एकात्मिक डास निर्मुलन योजना या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद रक्कम रु.३० कोटी मधून भागविणे शक्य आहे. परंतु जागतीक वाढलेल्या महामारीच्या पार्श्वभुमीवर सदरील जंतुनाशकासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे शक्य नसल्याने जागतिक महामारीच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) मधील प्रकरण ५ चे कलम (२) (२) अन्वये विना निविदा खरेदी करणे शक्य आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा खरेदी करणे शक्य आहे. तरी सोडियम हायपोक्लोरोईड १०% साठी रक्कम रु. रु.२,८३,२००/- एवढया होणाऱ्या खर्चास व विना निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णयः-**

कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी वसई विरर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष, मनपा दवाखाने, कंटमेंट झोन व मनपा कार्यालयामध्ये कोव्हिड-१९ महामारीच्या पार्श्वभुमीवर सॅनिटायझर फवारणी करणेकामी **१२००० लिटर सोडियम हायपोक्लोरोईड १०% हे जंतुनाशक खरेदी करणेकामी** नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे शक्य नसल्याने जागतिक महामारीच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) मधील प्रकरण ५ चे कलम (२) (२) अन्वये विना निविदा खरेदी करणे शक्य आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा खरेदी करणे शक्य असल्याने **१२००० लिटर सोडियम हायपोक्लोरोईड १०%** साठी रक्कम **रु.२,८३,२००/- (अक्षरी रक्कम रु.दोन लक्ष त्रयाऐंशी हजार दोनशे मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D/Aarogy/All puches item/Sodium haico plastic pump/Tipani Tharav

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ६८

विभाग :- वैद्यकिय आरोग्य विभाग
दिनांक :- २३/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बोळींज येथील प्रस्तावित कोविड रुग्णालयाच्या ठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यन्वीत करुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे तसेच म.म.अ.कलम ५ (२) २ अंतर्गत केलेल्या संविदेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...

---

**अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ७४,०८,८००/-**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बोळींज, विरार (प.) येथे रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. जगभर पसरलेल्या कोरोना (कोविड-१९) विषांणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केल्या आहेत. या प्रतिबंधात्मक उपाय-योजनाचा भाग म्हणुन कोरोना (कोविड-१९) विषांणुच्या संसर्ग रोखण्यासाठी शासनाने स्थानीक स्तरावर आवश्यकती कार्यवाही पार पाडण्याबाबत निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रात देखील कोविड-१९ अंतर्गत बाधीत रुग्णांची संख्या दिवसागणीक वाढत असून उपचार घेणाऱ्या रुग्णांना ऑक्सीजनचा पुरवठा अपुरा पडत आहे. यापुर्वी महापालिकेच्या श्री जिवदानी देवी कोविड रुग्णालयाकरीता तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणी करणे कामी प्रशासकीय ठराव क्र. ३२ दि.१२/०४/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) नुसार निविदा न मागविता संविदा करणेस प्रशासकीय ठराव क्र. ३४ दि. १५/०४/२०२१ अन्वये प्राप्त कोटेशनला मंजूरी देऊन संविदा करयास मान्यता दिली आहे.

उपरोक्त प्राप्त मंजूरीनुसार श्री जिवदानी देवी कोविड रुग्णालया करिता ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यान्वीत करुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.सोल्युशन्स, सर्वे नं.२०/१/२, काटे वस्ती, पुनावले, पुणे-४११०३३ यांना जा.क्र:वविशम/वैआवि/२४०/२१ , दि.१३/०४/२०२१ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे बाधीत रुग्णांच्या संखेत वाढ होत असून रूग्णांना आवश्यक ऑक्सीजनचा साठा अपुरा पडत असल्याने अशा आणीबाणीच्या परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असलेल्या ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट करीता तातडीची बाब म्हणुन मा.आयुक्त यांनी प्रस्तावित बोळींज येथील कोव्हीड हॉस्पिटल करिता ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारण्याचे निर्देश दिले आहेत त्याअनुषंगाने श्री जिवदानी देवी कोविड रुग्णालयाकरीता काम करणारे ठेकेदार मे.सोल्युशन्स, पुणे यांनाच जा.क्र:वविशम/वैआवि/२०७/२१ दि.२३/०४/२०२१ अन्वये बोळींज येथिल प्रस्तावित कोविड रूग्णालयासाठी तातडीने ऑक्सिजन प्लान्ट उभारणे कामी कार्यादेश देण्यात आला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका येथील नियोजित बोळींज कोव्हीड हॉस्पिटल येथे १२५ Cylinder per Day क्षमता असलेला ऑक्सिजन जनरेटर प्लांट उभारणी करुन कार्यान्वित करुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे करिता सुमारे रक्कम ७४,०८,८००/- रुपये खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
| --- | --- | --- |
| १. | **(ऑक्सीजन जनरेटर प्लांट साहित्य )** Design, Supply, Installation, Testing & Commissioning of onsite PSA medical oxygen generation plant : Microprocessor based (PLC with HMI screen) fully automatic oxygen generation plant as per ISO 10083:2006 standard to produce 150 jumbo oxygen cylinders (each 7m3 capacity) per day with oxygen purity of minimum 93%. Continuous oxygen supply through a single unit at pressure of 5 bar. The plant should comprise following items :-- Rotary Screw Air Compressor, Refrigeration Air Dryer, Activated Alumina, Pneumatic valves & Solenoid valves, Control Panel Switch Gear, Molecular Sieves, Oxygen tank filters (Pre, after and bacteria filters), Oxygen Flow Meter, Oxygen Analyzer Sensor, Stainless Steel System Piping, Oxygen Receiver Tank (2000 Ltr capacity), with switchover panel for standby Oxygen supply (for Backup cylinders). Including Packaging, Freight, & Transit Insurance charges. (including 1+2 year AMC) | ७४,०८,८००/- |

सदर कामाचा होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " **नैसर्गिक आपत्ती व इतर** " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब बोळींज येथील प्रस्तावित कोविड रुग्णालयाकरीता ऑक्सीजन जनरेटेड प्लान्ट उभारणे व त्रैवार्षिक देखभाल दुरूस्ती करणे कामी येणाऱ्या रू.७४,०८,८००/- खर्चाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७-३(क) नुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर तसेच **बोळींज येथिल प्रस्तावित कोविड रुग्णालयाकरीता** ऑक्सीजन जनरेटेड प्लॉन्ट उभारणे कामी निविदा न मागविता **मे.सोल्युशन्स, पुणे** यांच्या सोबत केलेल्या संविदेस व देण्यात आलेल्या कार्यादेशास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) नुसार कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे पुढे सविनय सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झापाट्याने होत असून नागरीकांना वैद्यकिय उपचाराची नितांत गरज आहे. बोळींज येथे महापालिकेचे प्रस्तावित रुग्णालयाचे काम सुरू असून त्याठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे आवश्यक आहे.

२. सदर रुग्णायाच्या ठिकाणी तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे व त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी केलेल्या निहित कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त विषयांकित कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) अन्वये निविदा न मागविता **मे.सोल्युशन्स, सर्वे नं.२०/१/२, काटे वस्ती, पुनावले, पुणे-४११०३३** यांस समवेत संविदा करून देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून सदर कामी येणाऱ्या रक्कम रू.७४,०८,८००/- (GST सह) खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ६८

विभाग :- वैद्यकिय आरोग्य विभाग
दिनांक :- २३/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) येथील प्रस्तावित कोविड रुग्णालयाच्या ठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यन्वीत करुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे तसेच म.म.अ.कलम ५ (२) २ अंतर्गत केलेल्या संविदेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...

---

**अंदाजपत्रकीय रक्कम** :- रू. १,५६,८०,०००/-

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) येथे रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत जगभर पसरलेल्या कोरोना (कोविड-१९) विषांणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केल्या आहेत. या प्रतिबंधात्मक उपाय-योजनाचा भाग म्हणुन कोरोना (कोविड-१९) विषांणुच्या संसर्ग रोखण्यासाठी शासनाने स्थानीक स्तरावर आवश्यकती कार्यवाही पार पाडण्याबाबत निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रात देखील कोविड-१९ अंतर्गत बाधीत रुग्णांची संख्या दिवसागणीक वाढत असून उपचार घेणाऱ्या रुग्णांना ऑक्सीजनचा पुरवठा अपुरा पडत आहे. त्याअनुषंगाने तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणी करणे आवश्यक आहे. जेणे करुन ऑक्सीजनचा पुरेसा साठा महानगरपालिकेकडे राहून अतिदक्ष विभागातील रुग्णांचा जीव वाचवण्यास मदत होवू शकते.

या कामी राज्यातील विविध महानगरपालिकेकडुन माहिती घेण्यात आली असता कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी दि.२२/०४/२०२१ रोजीचे जा.क्र:कडोंमपा/वै.आ/मु.का./३०१ अन्वये मे.टेक्नोमेट एन्टरप्रायझेस, शॉप नं.१०३, सर्वे नं.२६/०१, वरदविनायक कॉम्पलेक्स, नाऱ्हे, पुणे ४११ ०४१ यांना "ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट" बसविणेबाबत कार्यादेश दिले आहेत.

सद्य:स्थितीत कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे बाधीत रुग्णांच्या संखेत वाढ होत असून रूग्णांना आवश्यक ऑक्सीजनचा साठा अपुरा पडत असल्याने अशा आणीबाणीच्या परिस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असलेल्या ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट करीता तातडीची बाब म्हणुन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.२३/०४/२०२१ च्या बैठकीत नालासोपारा (प.) येथे प्रस्तावित कोविड रुग्णालयाच्या ठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट कार्यन्वीत करुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामी मे. टेक्नोमेट एन्टरप्रायझेस, शॉप नं.१०३, सर्वे नं.२६/०१, वरदविनायक कॉम्पलेक्स, नाऱ्हे, पुणे ४११ ०४१ यांना कर्यादेश देण्याबाबत निर्देश दिले असता जा.क्र:वविशम/वैआवि/२०६/२१-२२ दि.२३/०४/२०२१ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेस आवश्यक १७० ते २०० Cylinder per Day क्षमता असलेला ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट उभारणी करणेकरिता रक्कम १,५६,८०,००० रुपये खर्च अपेक्षित असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | भाग – 1<br>(ऑक्सीजन जनरेटर प्लांट साहित्य )<br>Onsite oxygen generator with air compressor / Regrigeration Air dryer Air Tank / Oxygen Tank Filters (Pre, After, and Bacteria Filters) oxygen generator with PLC based controller with inbuilt sensor, Manifold system for secondary oxygen supply, to suit equivalent to 170 to 220 Cylinder per day. Suit for 960 LPM. and 57.6 cum/hr. (including 1+2 year AMC) | रु.१,४०,००,००० |
| | GST (18%) | रु.१६,८०,००० |
| | एकूण | रु.१,५६,८०,००० |

सदर कामाचा होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " नैसर्गिक आपत्ती व इतर " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब नालासोपारा (प.) येथील प्रस्तावित कोविड रुग्णालयाकरीता ऑक्सीजन जनरेटेड प्लान्ट उभारणे व त्रैवार्षिक देखभाल दुरूस्ती करणे कामी येणाऱ्या रू.१,५६,८०,०००/- खर्चाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७-३(क) नुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर तसेच **नालासोपारा (प.) येथे प्रस्तावित कोविड रुग्णालयाकरीता** ऑक्सीजन जनरेटेड प्लॉन्ट उभारणे कामी निविदा न मागविता मे. **टेक्नोमेट एन्टरप्रायझेस, पुणे** यांच्या सोबत केलेल्या संविदेस व देण्यात आलेल्या कार्यादेशास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) नुसार कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे पुढे सविनय सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झापाट्याने होत असून नागरीकांना वैद्यकिय उपचाराची नितांत गरज आहे. बोळींज येथे महापालिकेचे प्रस्तावित रुग्णालयाचे काम सुरू असून त्याठिकाणी ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे आवश्यक आहे.

२. सदर रुग्णायाच्या ठिकाणी तातडीने ऑक्सीजन जनरेटर प्लांट उभारणे व त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी केलेल्या निहित कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त विषयांकित कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) अन्वये निविदा न मागविता **मे.टेक्नोमेट एन्टरप्रायझेस, पुणे** यांस समवेत संविदा करून देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून सदर कामी येणाऱ्या रक्कम रू.१,५६,८०,०००/- (GST सह) खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७० | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : २३/०२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेची रुग्णालये व माताबाल संगोपन केंद्रे येथे उपलब्ध असलेल्या सेल काऊंटर मशिनकरीता मे.एजिडी बायोमेडीकल यांचे अधिकृत पुरवठादार मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., यांना नियुक्त करुन यांच्यामार्फत आवश्यकतेनुसार रिएजंट पुरविणेकामी संविदा करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, विजयनगर तुळींज रुग्णालय, नालासोपारा व कोव्हीड रुग्णालये येथे मे.एजिडी बायोमेडीकल यांचेकडून सेल काऊंटर मशिन खरेदी करण्यात आलेले आहेत. सदर मशिनद्वारे रक्त तपासणी करणेकरीता रिएजंट याच उत्पादीत कंपनीचे असणे गरजेचे आहे. या संबंधित कंपनीने मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प.) यांना अधिकृत पुरवठादार म्हणून नियुक्त केलेले असून मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., यांचेमार्फत लॅब केमिकल्स (रिएंजट) सन २०२१-२२ २०२२-२३ व २०२३-२४ या त्रैवार्षिक करिता पुरविणेकामी दर मागविण्यात आले आहेत. सदर रसायनांची आवश्यकता लक्षात घेता सेल काऊंटर मशिनकरीता लागणारे लॅब रिएजंटचा समावेश ई-निविदा यादीत नसल्याने तसेच सदरचे रिएजंट संबंधित उत्पादीत कंपनीचेच असल्याने याकरीता स्पर्धा होत नाही. याकरीता सदरचे रिएजंट विनानिविदा खरेदी करणे गरजेचे आहे.

लॅब केमिकल्स (रिएजंट) चे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | रिएजंटचे नाव | पॅकिंग | दर |
|---|---|---|---|
| 1 | Autodil Plus | 20 LTRs | 3500 |
| 2 | Autoclean Plus | 1 LTRS | 2600 |
| 3 | Autolyse Plus | 500 ML | 5300 |
| 4 | Cleaning Solution B | 200 ML | 700 |

मे.एजीडी बायोमेडीकल प्रा.लि. यांचे अधिकृत पुरवठादार मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प.) यांच्या सोबत संविदा करणे गरजेचे आहे. दि.२३/०३/२०२१ रोजीच्या मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प.) यांच्या प्राप्त पत्रानुसार संबंधितांनी मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प.) यांना अधिकृत विक्रेता म्हणून नियुक्त केले आहे असे कळविले आहे. मे.एजिडी बायोमेडीकल यांनी

याबाबत मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प.) यांच्याबरोबर दि.२३/०३/२०२१ रोजी पत्रव्यवहार केलेला असून रिएजंट वरील मंजुर दरानुसारच पुरविण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

ठराव :- उपरोक्त रिएजंट विनानिविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरचे रिएजंट मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि. यांच्याकडून वित्तिय वर्ष सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी खरेदी करणेस व या कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता तसेच मे.प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि. यांच्याबरोबर संविदा करणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७९

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : २३/०४/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोवीड-१९ रुग्णालया करीता जम्बो ऑक्सिजन सिलिंडर खरेदी करणेस आदेश देणेकामी व त्या कामी येणाऱ्या खर्चाचे अग्रीम देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार व कौलसिटी वसई (प.) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) व म्हाडा बिल्डींग नं.१०, बोळींज येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. रुग्णांवरील वैद्यकीय उपचारा दरम्यान ऑक्सिजन देण्याची गरज भासू शकते. M/s. Everest Kanto Cylinder Ltd., Mumbai यांच्यामार्फत सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा पुरविली जात आहे. परंतू कोवीड-१९ संसर्ग झालेल्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता जम्बो ऑक्सिजन सिलिंडर खरेदी केल्यास जास्तीत जास्त रुग्णांना ऑक्सिजन सेवेचा लाभ देणे शक्य होणार आहे. सदरकामी दि.२२/०४/२०२१ रोजीच्या M/s. Everest Kanto Cylinder Ltd., Mumbai यांच्याकडून दरपत्रक प्राप्त झालेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | नाव | मागणी | दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | Jumbo Oxygen Cylinder (MO2,46,7LT, Q232,150 BAR,NRG with VALVE) | 300 | Rs.10,500/- | Rs.31,50,000/- |
| | | | GST 18 % | Rs.5,67,000/- |
| | | | Total | Rs.37,17,000/- |

सद्यस्थितीत कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता शासन मार्गदर्शन सुचनेनुसार साहित्य, उपकरणे इ. गोष्टी तातडीने खरेदी कराव्या लागतात. महाराष्ट्र कोवीड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये राज्यशासनाची दि.१४/०३/२०२० रोजी निर्गमित झालेल्या अधिसूचनेनुसार कोवीड प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी औषधे खरेदी करणेकामी व सदर औषधांचे दर निश्चित करणेकामी समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीच्या मान्यतेने सदर वस्तुची तातडीने खरेदी करणे कामी ३०० नग जम्बो सिलिंडर M/s. Everest Kanto Cylinder Ltd., Mumbai यांच्यामार्फत स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. वरील तक्यातील नमुद जम्बो ऑक्सिजन सिलिंडर खरेदी करणेकामी एकूण रक्कम रु.३७,१७,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर असलेल्या "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ अन्वये मला असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त जम्बो ऑक्सिजन सिलिंडर M/s.Everest Kanto Cylinder Ltd., Mumbai यांच्यामार्फत विनानिविदा ३०० नग खरेदी करणेकामी एकूण रक्कम रु.३७,१७,०००/- (अक्षरी- सदोतीस लाख सतरा हजार रूपये मात्र) इतक्या रक्कमेचे अग्रीम देयक अदा करणेस व पुरवठा आदेश देणेकामी प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcoporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.:- ७२

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक : २३/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- जाहिरात विभागातर्फे अनधिकृत होर्डिंग्ज हटविणेकामी मनुष्यबळ व लागणारे यंत्रसाधनसामुग्री उपलब्ध करुन मिळणे व त्याकामी होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** :- वसई- विरार शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,व ३८६ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आकाशचिन्ह व दृश्य भागातील जाहिराती यांचे नियंत्रण तसेच त्यांना कर/ फी लावणे यांचे अधिकार प्राप्त आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात विभाग, मनपाच्या कार्यक्षेत्रात "ए ते आय" प्रभाग समिती अंतर्गत येणा-या प्रभागनिहाय प्रभाग समिती स्तरावर परिसरात मनपाच्या जागेवरील अनधिकृत /धोकादायक होर्डिग्ज निष्कासित करण्याचे कामकाज प्रभाग समिती व जाहिरात मुख्यालय यांचे संयुक्तपणे तातडीने नऊ प्रभाग समिती स्तरावर अनधिकृत/ जाहिरात विभागामार्फत घेण्यात येते.

सदरील निष्कासनाच्या मोहीमेचे कामकाज सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरीता नऊ प्रभाग समिती मिळून अंदाजित २२ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तरी निष्कासित कारवाई दरम्यान यंत्रसामुग्री, मनुष्यबळ इत्यादी उपलब्ध होणे आवश्यक आहे तरी महानगरपालिकेकडे साधनसामुग्री उपलब्ध नसल्याने साधनसामुग्री भाडे तत्वावर घेण्यात येते असल्यामुळे महानगरपालिकेचा वेळ वाया जात आहे तरी नऊ प्रभाग समिती मधील अनधिकृत होर्डिग्ज/बॅनर व इतर प्रदर्शित करण्यात येणा-या जाहिराती इत्यादी वर कारवाई करणेकरीता ठेकेदाराची नेमणुक झाल्यास काम करणे सुलभ होईल त्याकरीता निष्कासनाची कारवाई करणेकामी ठेकेदाराकडून मनुष्यबळ व लागणारे यंत्रसाधनसामुग्री उपलब्ध करुन मिळणेकामी वार्षिक दरपत्रक मागवून, ठेकेदाराची नेमणुक करणे व त्याकामी येणा-या खर्चास अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधुन लेखाशीर्ष अतिक्रमण हटविणे व अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी, वाहनभाडे व इतर खर्च. लेखा सकेतांक ०९-२५५०-६ या शिर्षकाखाली होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी घेणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

**प्रस्तावाचा ठराव** :- महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "ए ते आय" कार्यक्षेत्रात प्रभाग निहाय जाहिरातीची परवानगी देण्यात येते. काही जाहिराती महानगरपालिकेच्या परवानगीविना शहरामध्ये मोठमोठया इमारती व महानगरपालिकेच्या जागांवर होर्डिग्ज स्वरुपात अनधिकृतरित्या उभारलेल्या असतात. सदर अनधिकृत होर्डिग्ज निष्कासित करणेकरिता यंत्रसाम्रगी व मनुष्यबळाची आवश्यकता असते. सदर यंत्रसाम्रगी व मनुष्यबळ उपलब्ध करुन मिळणेकामी रक्कम रु.२२ लक्ष इतका वार्षिक खर्च विभागास अपेक्षित आहे त्यानुंषगाने जाहिरात विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदर कामी होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेस व ई- निविदा प्रक्रिया करणेस सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ७३

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :23/04/2021

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेबाबत...

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** जगभरात पसरलेल्या कोरोना (COVID-19) विषांणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केले आहेत. याच प्रतिबंधात्मक उपाय-योजनेचा भाग म्हणुन कोरोना (COVID-19) विषांणुच्या संसर्गामुळे मृत पावणारे शरीर ठेवणेकरिता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु), येथे शवपेटी (मॉच्युरी) बसविणेबाबत मा.आयुक्त सो., यांचे दालनात डॉक्टर व अभियंता समावेत झालेल्या रुग्णालयीन कामकाजाच्या आढावा बैठकित सुचित केले आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात शवपेटी (मॉच्युरी) बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणेची कामे मे.एरियांझ यांचे कडुन सातत्याने करणेंत येतात. याकरिता, संदर्भिय क्र.1 अन्वये मे.एरियांझ यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्यालय आवक क्र.1794, दि.22/04/2021 रोजीचे पत्रान्वये दर (कोटेशन) महानगरपालिकेस सादर केले आहे.

"वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने खालील नमुद केलेले कामाकरिता मा.आयुक्त सो., यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | एच | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | कामाचे स्वरुप:- स्टेनलेस स्टील 304 व 80mm जाडीची 12 मृत शरीर ठेवणेकरिता शवागार पेटी, कॉपर पाईप, 200 स्के.फुट x 160 डक्टींगचे आवरण, इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनल, 900 क्युबीक फिट पर मीटर क्षमतेचे एअर हॅन्डलिंग युनिट (12 स्टेचर सह) ॲल्युमिनीअम एरो फाईल डॅम्पर, 3 टन क्षमतेचे कन्डेंसर युनिट, व्होल्टेज स्टॅबिलायझर-1 नग इ. बसवुन कार्यान्वित करणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे. | 17,85,340/- |

उपरोक्त वर नमुद केलेप्रमाणे शवपेटी, एअर हॅन्डलींग युनिट (AHU), कंट्रोल पॅनल व संतुलित वीज भाराकरिता स्टॅबिलायझर बसविणें कामांकरिता उपरोक्त संदर्भिय क्र.2 अन्वये सादर केलेल्या दरपत्रक प्रमाणे रक्कम 17,85,340/- रुपये पर्यंत खर्च अपेक्षित राहील.

सदर खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "शव विच्छेदन गृह/ शवागृह/ मॉच्युरी व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 2,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब उपरोक्त नमुद ठिकाणी शवपेटी, एअर हॅन्डलींग युनिट (AHU), संतुलीत विजभाराकरीता स्टॅबिलायझर व त्याअनुषंगिक कामे करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) (क) अन्वये मा.आयुक्त सो. यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम 17,85,340/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मला प्राप्त असलेले अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. ७४**

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**

**दिनांक :- २७/०४/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करणेसाठी उभारण्यात आलेल्या विलगीकरण मशीनचे कनवेअर बेल्ट खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणे बाबत.**

**प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करणेसाठी १० विलगीकरण मशीन (ट्रॉमेल) खरेदीसाठी प्रशासकीय ठराव क्र.१५० दि.०६/१०/२०२० अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार वृत्तपत्रातून जाहिर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेमध्ये मे.अंबिका इंटरप्रायजेस यांची सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. त्यानुसार मे.अंबिका इंटरप्रायजेस यांनी १० विलगीकरण मशीनपैकी २५ mm size च्या २ मशीन गोखिवरे येथील क्षेपणभुमीवर प्रस्थापित केल्या असून १०० mm size च्या २ मशीन बसविण्याचे काम सुरू आहे.

यापैकी २५ mm size च्या २ ट्रामेल द्वारे कच-याचे विलगीकरण करण्याचे काम सुरु आहे. परंतू १०० mm size च्या २ ट्रॉमेल बसविल्यानंतर १०० mm ट्रॉमेल मधून मोठया आकाराचा कचरा विलगीकरण होणार आहे. तथापि १०० mm आकारापेक्षा कमी आकाराचा कचरा पुढील २५ mm size ट्रॉमेल यांना जोडणारा कनवेअर बेल्ट आवश्यक आहे, जेणेकरुन दोने ही ट्रॉमेल यांच्या कामामध्ये सलगता राहणार आहे व २५ mm size ट्रॉमेल मधील हॉपर मध्ये कचरा भरण्याकरिता वेगळया जेसीबी ची आवश्यकता राहणार नाही. करिता २५ mm size आणि १०० mm ट्रॉमेल यांच्यामध्ये दुवा म्हणून नव्याने ३ फुट रुंद आणि १४ फुट लांबीचे २ कन्वेअर बेल्ट खरेदी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन दोन ट्रॉमेल मध्ये सलगता निर्माण होऊन वेळ आणि श्रम यांची बचत होऊन कामाचा वेग वाढवता येईल. यासाठी अंदाजे **रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.सहा लक्ष मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी **सदरील खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील साफसफाई साहित्य खरेदी** या लेखाशिर्षावरील तरतुद **रक्कम रु.५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे.

D:\Aarogy\All purches Item\vahan kharedi\Tromel/Tipani Tharav

परंतु कनवेअर बेल्ट हा सदर महाराष्ट्र शासनाच्या Gem Portal वरुन खरेदी करणेकरिता छाननी केली असता ट्रोमेलच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबी (Technical specification) जुळून येत नाहीत.त्यामुळे सदर कनवेअर बेल्ट ई-निविदेद्वारे खरेदी करणे योग्य ठरले. सोबत Gem Portal वरील बाबींच्या पडताळणीचा तक्ता जोडला आहे. तरी गोखिवरे क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करणेसाठी उभारण्यात आलेल्या विलगीकरण मशीन करिता कनवेअर बेल्ट ई-निविदा मागवून खरेदी करणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करणेसाठी उभारण्यात आलेल्या विलगीकरण मशीनसाठी ३ फुट रुंद आणि १४ फुट लांबीचे २ कनवेअर बेल्ट खरेदी करणेकामी ई-निविदा मार्गविणे व त्याकामी होणाऱ्या अंदाजीत खर्च **रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.सहा लक्ष मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D:\Aarogy\All purches Item\vahan kharedi\Tromel/Tipani Tharav

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ७५ — विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२७/०४/2021

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेबाबत...

**प्रस्तावाचा मजकुर :-** जगभरात पसरलेल्या कोरोना (COVID-19) विषांणुच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केले आहेत. याच प्रतिबंधात्मक उपाय-योजनेचा भाग म्हणुन कोरोना (COVID-19) विषांणुच्या संसर्गामुळे मृत पावणारे शरीर ठेवणेकरिता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु), येथे शवपेटी (मॉच्युरी) बसविणेबाबत मा.आयुक्त सो., यांचे दालनात डॉक्टर व अभियंता समावेत झालेल्या रुग्णालयीन कामकाजाच्या आढावा बैठकित सुचित केले आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात शवपेटी (मॉच्युरी) बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणेची कामे मे.एरियांझ यांचे कडुन सातत्याने करणेंत येतात. याकरिता, संदर्भिय क्र.1 अन्वये मे.एरियांझ यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्यालय आवक क्र.1794, दि.22/04/2021 रोजीचे पत्रान्वये दर (कोटेशन) महानगरपालिकेस सादर केले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | एच | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | स्टेनलेस स्टील 304 व 80mm जाडीची 6 मृत शरीर ठेवणेकरिता शवागार पेटी, कॉपर पाईप, 200 स्के.फुट x 160 डक्टींगचे आवरण, इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनल, 900 क्युबीक फिट पर मीटर क्षमतेचे एअर हॅन्डलिंग युनिट (12 स्टेचर सह) ॲल्युमिनीअम एरो फाईल डॅम्पर, 3 टन क्षमतेचे कन्डेंसर युनिट, व्होल्टेज स्टॅबिलायझर-1 नग इ. बसवुन कार्यान्वित करणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे. अंदाजपत्रकीय रक्कम : 17,85,340/- | मे.एरियांझ |

सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. २३/०४/2021 रोजीचे ठराव क्र. ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

तरी सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण-5, संविदा-2 (2) नुसार निविदा न काढता उत्पादक मे.एरियांझ यांचे कडुन प्राप्त दरानुसार करुन घेणेकरिता संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदु स्मशानभुमी, नवघर (पु) येथे नविन शवपेटी (मॉच्युरी) बसवुन त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकरिता **उत्पादक मे.एरियांझ** यांचे कडुन प्राप्त दरानुसार काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

27/5/2024

# वसई विरार शहर महानगरपालिका

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

प्रशासकीय ठराव क्र. ७६ दिनांक :- २८/०४/२०२१

**विषय :-** **सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करुन रहदारीला अडथळा निर्माण केलेल्या वाहनचालकांकडून प्रशासकीय दंड वसूली करणेकरिता नियुक्त (२) ठेकेदारांचे काम रद्द करुन अन्य ठेकेदारास काम देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी तसेच जाहिरात प्रतिबंध व व्यापार वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे नियम कायदा २००२ चे कलम ३१ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुल करणेकामी सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वित्तीय वर्षांकरिता प्रभाग समिती A ते I मध्ये ई-निविदा मागविणेकामी व येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

दि. ०५/०२/२०२१ रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. ४६२ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर वाहने उभी करून रहदारीला तसेच रस्ते साफसफाईस अडथळा निर्माण करणाऱ्या दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांवर खालीलप्रमाणे सुधारीत प्रशासकीय दंड वसुल करण्याचे प्रस्तावित करुन ६ टोईंग व्हॅन व २७ कामगार पुरविणेकामी तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील कलम ५ (२)(२) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली आहे. पोलीस निरिक्षक (वाहतूक शाखा), वसई यांचेकडील पत्र क्र. १७/२०२१, दि. १८/०१/२०२१ नुसार अस्तित्वातील दंडाची रक्कम व टोईंग अभिकर्त्याने वाहनचालकाकडून वसुल करावयाचे शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**तक्ता 'अ'**

| अ.क्र. | वाहन प्रकार | शासकीय दंड रक्कम | टोईंग सेवा शुल्क | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | शुल्क | GST | एकूण |
| १. | दुचाकी मोटार वाहने | रु. २००/- | रु. १७०/- | १८% | रु. २००/- |
| २. | तीनचाकी वाहने ऑटो रिक्षा | रु. २००/- | रु. १७०/- | १८% | रु. २००/- |
| ३. | चारचाकी वाहने कार जिप, मोटार टॅक्सी | रु. २००/- | रु. २५५/- | १८% | रु. ३००/- |

टोईंगकामी नवीन ठेकेदार/एजन्सी नियुक्त होईपर्यंत, घनकचरा व्यवस्थापन विभागातील दि.२०/१०/२०१८ नुसार कार्यादेशान्वये स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुल करणेकामी नियुक्त ठेकेदारांकडून प्रभागनिहाय खालील तक्त्यानुसार टोईंग व्हॅन व कामागार पुरविण्याबाबत मंजुरी देण्यात आली आहे.

**तक्ता 'ब'**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रभाग समिती | टोईंग वाहनांची संख्या | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | एव्हरग्रीन सिक्युरिटी सर्व्हिसेस | प्रभाग A | ०१ | ०५ |
| | | प्रभाग C | ०१ | ०५ |
| २. | सुरक्षा गार्ड सर्व्हिसेस | प्रभाग D | ०१ | ०४ |
| | | प्रभाग E | ०१ | ०३ |
| ३. | मे. बक्षी सिक्युरिटी ऍण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. | प्रभाग G | ०१ | ०५ |
| | | प्रभाग H | ०१ | ०५ |

उपरोक्तनुसार याकामी आवश्यक तो करारनामा करुन घेण्यात आला व कार्यादेश करण्यात आला.

तथापि सुरक्षा गार्ड सर्व्हिसेस, व मे. बक्षी सिक्युरिटी ऍण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी दि. ३१/०३/२०२१ रोजी पत्र देऊन सदर करारनामा रद्द करणे व टोईंग चे काम बंद करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. त्यानुसार सदर एजन्सीज यांनी काम बंद केले आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन रहदारीस खोळंबा होत आहे. तरी सदरकामी निविदा प्रक्रिया करण्याचे काम सुरु असून निविदा प्रक्रिया द्वारे नवीन ठेकेदार/एजन्सीज नियुक्त होई पर्यंत प्रस्तुत कामी दि. १६/०४/२०२१ रोजी बरकत कॉन्ट्रक्टर यांनी विनंती पत्र देऊन टोईंग सेवा पुरेशा मनुष्य बळासह व आवश्यक पायाभूत सुविधेसह पुरविणेबाबत तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार सुरक्षा गार्ड सर्व्हिसेस, व मे. बक्षी सिक्युरिटी ऍण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. यांची विनंती मान्य करुन बरकत कॉन्ट्रक्टर यांना टोईंग सेवा पुरविणेकामी मंजुरी देणेबाबत प्रस्ताव सादर.

<u>**ठराव निर्णय :-**</u> उपरोक्तनुसार सुरक्षा गार्ड सर्व्हिसेस व मे. बक्षी सिक्युरिटी ऍण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. यांची विनंती मान्य करण्यात येऊन बरकत कॉन्ट्रक्टर यांनी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार टोईंग सेवा पुरेशा मनुष्य बळासह व आवश्यक पायाभूत सुविधेसह पुरविणेबाबत

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील कलम ५ (२)(२) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रभाग समिती | टोईंग वाहनांची संख्या | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | एव्हरग्रीन सिक्युरिटी सर्व्हिसेस | प्रभाग A | ०१ | ०५ |
| | | प्रभाग C | ०१ | ०५ |
| २. | बरकत कॉन्ट्रक्टर | प्रभाग D | ०१ | ०४ |
| | | प्रभाग E | ०१ | ०३ |
| ३. | बरकत कॉन्ट्रक्टर | प्रभाग G | ०१ | ०५ |
| | | प्रभाग H | ०१ | ०५ |

वरील सुधरित तक्त्यानुसार बरकत कॉन्ट्रक्टर यांचे सोबत आवश्यक तो करारनामा करुन घ्यावा व कार्यादेश निर्गमित करावे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ७८

विभाग :-घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :- २८/०४/२०२१

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क तसेच साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये दंड वसुल करणेकामी नवीन एजन्सी/ अभिकर्ते नेमणे करिता ई-निविदा काढणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उवपद्र नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुली करणेकामी क्लिनअप मार्शल नेमणूक करणेकामी मा.महासभा ठराव क्र.१२ दि.१४/०८/२०१८ अन्वये प्रशासकीय वित्तीय मान्यता घेऊन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सर्वात जास्त दराच्या निविदा मध्ये १)मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस, २)मे. सिंग इंटेलिजेन्स सेक्यूरीटी प्रा.लि., ३)मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस, प्रभाग समिती , ४) मे. बक्शी सीक्युरीटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि., या निविदाकारांचे सर्वात जास्त दर मंजूर झाले आहेत. सदरील प्राप्त दर मा.स्थायी समिती ठराव क्र.०३ दि.२६/०९/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदरील निविदाधारकां सोबत दि.१९/१०/२०१८ रोजी करारनामा करुन सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वर्षाकरिता मनपा हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणेकामी दि.२०/१०/२०१८ रोजी १)मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस - प्रभाग समिती A, C २)मे. सिंग इंटेलिजेन्स सेक्यूरीटी प्रा.लि. - प्रभाग समिती B, ३)मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस- प्रभाग समिती, D,E,F,I ४) मे. बक्शी सीक्युरीटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि.- प्रभाग समिती G,H या निविदेकारांना कार्यादेश देण्यात आला आहे.

त्यानुसार सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वर्षात मंजूर अभिकर्त्यांनी खालीलप्रमाणे प्रशासकीय शुल्क वसुल केला आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | अभिकर्त्यांचे नाव | महानगरपालिकेत टक्केवारी प्रमाणे (%) जमा | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात वसुल केलेला प्रशासकीय शुल्क | सन २०१९-२० या वित्तीय वर्षात वसुल केलेला प्रशासकीय शुल्क | सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात वसुल केलेला प्रशासकीय शुल्क (माहे एप्रिल-२०२० ते फेब्रुवारी-२०२१) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | A | मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस | ७० | रु.३,५०,०००/- | रु.७,७०,०००/- | रु.७,३५,०००/- |
| २ | B | मे. सिंग इंटेलिजेन्स सेक्यूरीटी प्रा.लि. | ७१ | रु.४,०१,१५०/- | रु.११,३९,५५०/- | रु.९,१२,३५०/- |
| ३ | C | मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस | ७० | रु.३,५०,०००/- | रु.६३,०,०००/- | रु.६६,५०००/- |
| ४ | D | मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस | ७८ | रु.६,७४,७००/- | रु.६,५९,१००/- | रु.३,२५,६५०/- |
| ५ | E | मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस | ७८ | रु.२४९,६००/- | रु.१९५०००/- | रु.१,३२,६००/- |
| ६ | F | मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस | ८१.५० | रु.३,४६,३७५/- | रु.२,५२,६५०/- | रु.२,०७,८२५/- |
| ७ | G | मे. बक्शी सीक्युरीटी ऍण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि. | ७२ | रु.३,७४४००/- | रु.५,२३,८००/- | रु.२,७०,०००/- |
| ८ | H | मे. बक्शी सीक्युरीटी ऍण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि. | ७० | रु.४,६९,०००/- | रु.१,४०,०००/- | रु.१,४७,०००/- |
| ९ | I | मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस | ७० | रु.२,१०,०००/- | रु.२४,५००/- | रु.३३,२५०/- |
| एकुण | | | | रु.३४,२५,२२५/- | रु.४३,३४,६००/- | रु.३४,२८,६७५/- |

तरी वरीलप्रमाणे सदरील अभिकर्त्यांनी प्रशासकीय शुल्क मनपा फंडात जमा केला आहे. परंतु सदरील अभिकर्त्यांची कामाची मुदत ३१ मार्च २०२१ या महिन्यात संपली आहे. १)मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस - प्रभाग समिती A, C २)मे. सिंग इंटेलिजेन्स सेक्यूरीटी प्रा.लि. - प्रभाग समिती B, ३)मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस, प्रभाग समिती - D,E,F,I ४) मे. बक्शी सीक्युरीटी ऍण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि. - प्रभाग समिती G,H या मंजूर अभिकर्त्यांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता प्रथम मुदतवाढ देणे किंवा नव्याने ई-निविदा प्रक्रिया करुन नविन अभिकर्त्यांची नेमणूक करणे या बाबत आदेश होणेस सदरचा प्रस्ताव सादर.

D:\Aarogy\Marshal/clean up marshal mudatvad tipani

**<u>ठराव निर्णय :-</u>** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क तसेच साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये दंड वसुल करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन नवीन अभिकर्त्यांची नेमणूक करावी. सदर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सद्यस्थितीतील मंजूर निविदेकार यांना मुदतवाढ देण्यात यावी, यांस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येते.

(गंगाथरन डी.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D:\Aarogy\Marshal/clean up marshal mudatvad tipani

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**

दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकिय ठराव क्र. ७८ | विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२१/०४/2021

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विदयुतीकरणाची कामे करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसुन आले आहे आणि या प्रादुर्भावामुळे कोरोना (कोविड-19) चा संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यास्तव कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेंकरिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एच) कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारासाठी कौलसिटी कोरोना केअर सेंटर (रुग्णालय) उभारण्यात आले आहे.

सदर रुग्णालयातील तळमजला येथे ICU विभाग, पहिला माळा येथे अलगीकरण कक्ष-1 व दुसरा माळा येथे अलगीकरण कक्ष-2 यामध्ये वेंटिलेटर बेडचे प्रयोजन करण्यात येणार आहे. वेंटिलेटर मशिन व वैद्यकिय उपकरणे गरम होऊन नादुरुस्त होऊ नयेत याकरिता सदर ठिकाणी वातानुकुलित यंत्रणा बसविणे गरजेचे असलेबाबत प्र.नियंत्रण अधिकारी, कौल सिटी समर्पित कोव्हीड रुग्णालय यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

याकरिता, सदर इमारतीत खालील नमुद केलेप्रमाणे वातानुकुलित यंत्रणा व त्याअनुषंगिक विदयुतीय कामे करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विदयुतीकरणाची कामे करणे. | वातानुकुलित यंत्रणा 1.5 टन-14 नग, कॉपर पाईप-50 मी, इन्व्हर्टर 2500VA-1 नग, बॅटरी 200 AH-2 नग, स्टॅन्ड फॅन 450 mm-10 नग, सिलिंग फॅन 1200mm-5 नग, टयुब लाईट-10 नग, 5/15 A मॉडयुलर बॉक्स-7 नग, 12 मॉडयुलर स्विच बॉक्स-20 नग, पॉईट वायरींग-60 नग, इंडीकेटर-20 नग, SPMCB-20 नग, 3x6sq.mm कॉपर केबल -480 मी, 4x6sq.mm कॉपर केबल-50 मी, 4x16 sq.mm ॲल्युमिनियम केबल-70 मी, 4x70sq.mm ॲल्युमिनियम केबल-30 मी, 4x120 sq.mm ॲल्युमिनियम केबल-90 मी, MCCB panel board-1 नग, डिस्ट्रीबीशन बॉक्स 24way-3 नग, 3 पोल MCCB 200A-1 नग, न्युट्रल लिंक-1 नग, चेंज ओवर 200A-2 नग, बसबार 200A-1 नग, डिजिटल एम मीटर-1 नग, डिजिटल व्होल्ट मीटर-1 नग, करंट ट्रान्सफॉर्मर-1 नग, LED इंडीकेटर-3 नग, अर्थिंग प्लेट-2 नग, कॉपर वायर-8 कि.ग्रॅ., FPMCB 40 A To 63 A-22 नग, SPMCB 6 A TO 32 A-30 नग, 2x10 कॉपर वायर-30 मी, CRCA Sheet Box-3 नग, DWC पाईप 75 एम.एम-82 मी, GI पाईप-18 मी , | 15,76,445/- |

"आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने वर नमुद केलेली विद्‌युतीय कामे तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता सदर कामाचे सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्‌युत) जिल्हा दर सुचीनुसार रक्कम 15,76,445/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

उपरोक्त नमुद विद्‌युतीकरण करणे कामी होणारा खर्च सन 2020-21 या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती इतर" या लेखाशिर्षकातील रक्कम 10,00,00,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील कौलसिटी कोरोना केअर सेंटर रुग्णालयात नव्याने वातानुकुलित यंत्रणा व विद्‌युतीकरणाची कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 15,76,445/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा पशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ७८ | विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- २९ / ०४ /२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी अॅलम पुरवठा करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत

**प्रस्तावाचा मजकूर :-**

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | **रु. १,६८,२३,६२२ /- (१२% GST सह )** |
| प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका) | :- | मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५ दि. २०/०१/२०२० |
| तांत्रिक मान्यता | :- | I/२८/२६६/२०१९-२० दि. १८/०३/२०२० |
| ई - टेंडरींग द्वारे प्रथम वेळ निविदा सुचना प्रसिद्धी | :- | वविशम/पापु/५९/२०२० दि. ०९/०५/२०२० |
| वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- | दै. नवाकाळ, दै. आपल महानगर, दै. मिड डे, दै. प्रात:काल, दै. नवभारत, दै. वृत्तमानस, दै. दि फ्री प्रेस जनरल |
| निविदा समिती | :- | दि. २५/०९/२०२० रोजीची बैठक निर्णय :- १२% ऐवजी १८% GST लागू असल्याने GST वगळून निविदा प्रसिध्द करण्यास मंजूरी |
| मा. आयुक्त साहेब. | :- | GSTवगळून निविदा प्रसिध्द करणेकरीता दि. २०/१०/२०२० रोजीची मंजूर टिपणी |
| **व्दितीय वेळ निविदा किंमत** | :- | **रु. १,५०,२१,०९०/- (GST वगळुन)** |
| ई - टेंडरींग द्वारे व्दितीय वेळ निविदा सुचना प्रसिद्धी | :- | वविशम/पापु/ ३७३ /२०२० दि. ०३/११/२०२० |
| वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- | दै. खबरे आजतक, दै.द फ्रि प्रेस जर्नल, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै.पुढारी, दै. मिड डे दि. ०५/११/२०२० |

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. २०/११/२०२०

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा :- ०३

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा. शहर अभियंता

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक ( व्दितीय लखोटा) :- दि. १०/१२/२०२०

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार :- ०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | निविदा धारकाचे नाव | निविदा दर + १८% GST |
|---|---|---|
| १ | **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** | ३३.५०% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) **वाटाघाटी अंती २३.२५% (निविदा रक्कमेच्या जादा दराने)** |
| २ | मे. सार्क केमीकल्स | ३७.००% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) |
| ३ | मे. जे. के. इंन्डस्ट्री | ३८.५०% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) |

उपरोक्त निविदाकारांनी भरणा केलेल्या दराची तुलना केली असता, **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांनी वाटाघाटीअंती निविदा रक्कमेच्या **२३.२५%** जादा दर हा इतर निविदा दरांपेक्षा कमी आहे. सदरच्या दराबाबत **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांनी स्पष्टीकरण दिले असुन त्यानुसार भरणा केलेला दरामध्ये वाहतुक तसेच अॅलम ट्रकमध्ये भरणा करणे व केंद्रावर उतरवणे याचा समावेश आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलशुध्दीकरण केंद्रावर अॅलम पुरवठा करणेकामी दि. ०१/०४/२०२१ रोजी **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.यांना** कार्यादेश दिला असून मजिप्रा कडील लघुत्तम दर हा रू. १०,८७४/- प्रती टन (GST वगळुन) आहे. तसेच **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांनी महापालिकेस वाटाघाटीअंती निविदा रक्कमेच्या २३.२५% जादा दर सादर केला असून सदरचा दर व त्यावरील १८ % GST गृहित धरून रक्कम रू. १०,७४०/- प्रती टन (GST सहित) असा प्राप्त होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यादेशातील दराशी तुलना केली असता **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा. लि.** यांचा दर वाजवी असल्याचे दिसुन येते. सदरचा देकार हा कमी व वाजवी असुन **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांच्या निविदा रक्कमेच्या **२३.२५%** (जादा दराने) **+ १८% GST** सह एकूण रक्कम रु. २,१८,४५,९२१/- इतकी होत असुन त्याकरीता अंतिम वित्तीय मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे. तरी मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि यांच्या वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरास निविदा समितीने दि. ०१/०४/२०२१ रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांच्या वाटाघाटी अंती निविदा रक्कमेच्या २३.२५% जादा दराची निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व अंतिम वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव :-** उपरोक्त कामी **मे. ठक्कर इनऑरगॅनिक्स प्रा.लि.** यांच्या वाटाघाटी अंती निविदा रक्कमेच्या २३.२५ % (जादा दर) + १८ % GST सह मंजूरी देण्यात येत असुन त्याअनुषंगाने होणाऱ्या रक्कम रु .२,१८,४५,९२१/- खर्चास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

29/4/2021

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई - विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ८०

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- २९/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- २०२१-२२ व २०२२-२३ वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे

**प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**अंदाजपत्रकीय रक्कम** :- रु. १०,००,०००/-

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ व ३ अंतर्गत २०० द.ल.ली , उसगाव योजनेअंतर्गत २० द.ल.ली, पेल्हार योजनेअंतर्गत १० द.ल.ली. असा एकूण २३० द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे.

उपरोक्त योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी निर्जतुकी करणासाठी क्लोरिन गॅस वापरण्यात येतो. सदर क्लोरिन गॅसचे डोसेज देण्याकरीता प्रत्येकी जलशुध्दीकरण केंद्रावर ( १ Pre & Post) Working व (१ Pre & Post) Stand by अशी व्यवस्था आहे. क्लोरिन गॅसच्या संपर्कामुळे क्लोरिनेशन यंत्रणेचे काही (Spares) भाग उदा. Inlet Valve, Outlet Valve हे वांरवार खराब होत असतात. पाणी शुध्दीकरणाच्या प्रक्रियेमध्ये क्लोरिनेशन यंत्रणा महत्वाची असते. तसेच क्लोरिन गॅस ची गळती झाल्यास क्लोरिन गॅस मानवी आरोग्यास अपायकारक व हानीकारक असतो. सुर्या योजना टप्पा १ व ३, उसगाव योजना, पेल्हार व फुलपाडा योजनेअंतर्गत (Pre & Post) असे एकूण १४ क्लोरिनेशन युनिट आहेत. त्यामुळे क्लोरिनेशन यंत्रणेची निगा राखणे व वेळोवेळी त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. माहे ऑक्टोंबर २०२१ मध्ये उपरोक्त कामी अस्तित्वातील ठेक्याची मुदत संपृष्ठात येणार असल्याने नव्याने बी/२ प्रकारची ई – निविदा मागविणे योग्य होईल. सदर कामी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रु. ५.०० लक्ष व सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता ५.०० लक्ष खर्च अपेक्षित असुन " **सुर्या योजना देखभाल दुरूस्ती** " या लेखाशिर्षामधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामासाठी बी / २ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १०,००,००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव** :- . २०२१-२२ व २०२२-२३ वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरिनेशन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे कामी बी/२ प्रकारची ई – निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १०,००,०००/- इतक्या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. ८९**

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- २९/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२१-२२, २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता वसई - विरार शहर महानगरपालिका सुर्या उद्भव (टप्पा – १ व ३) १०० द.ल.ली क्षमता योजनेच्या धुकटन जलशुध्दीकरण केंद्रामधील Surge Vessel यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे.

---

**प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १०,००,०००/-**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई - विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजनेअंतर्गत (टप्पा-१ व ३ ) २०० द.ल.ली. पाणी पुरवठा होत असून धुकटण येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. जुन्या सुर्या योजनेअंतर्गत धुकटण जलशुध्दीकरण केंद्र ते डवलीपाडा BPT पर्यंत एकूण १.४० कि.मी इतकी मृदृ पोलादी (MS) उर्ध्ववाहिनी (Rising Main) अंथरण्यात आली असुन १०० मी. डिलीवरी हेड आहे. तसेच नविन योजनेअंतर्गत धुकटन जलशुध्दीकरण केंद्र ते काशिदकोपर MBR पर्यंत एकुण २८ कि.मी. इतकी मृदु पोलादी (MS) उर्ध्ववाहिनी (Rising Main) अंथरण्यात आली असुन ८६ मी. डिलीवरी हेड आहे. उपरोक्त दोन्ही योजनेच्या जलवाहिनीमध्ये MSEB मार्फत विद्युत पुरवठा खंडीत झाले असता जुन्या योजनेचे ८०० अश्वशक्तीचे ३ व ३०० अश्वशक्तीचे १ तसेच नविन योजनेचे ६०० अश्वशक्तीचे ४ पंप अचानक बंद होतात व त्यामुळे उर्ध्व वाहिनीमध्ये Water Hammer तयार होऊन जलवाहिनी व पंपावर खुप मोठ्या प्रमाणात (जवळ जवळ नियमीत प्रेशरच्या दुप्पट प्रेशर) बॅक प्रेशर तयार होतो. त्यामुळे जलवाहिनी फुटणे/ एअरव्हॉल फुटणे/ पंप नादुरूस्त होणे अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा Water Hammer बंदीस्त करणे करीता जलवाहिनीस Surge Vessel / Air Vessel बसविण्यात येतात. जेणे करून सदरचा येणारा Surge बंदीस्त करून जलवाहिनी/पंपाची होणारी हानी टाळता येऊ शकते. त्याकरीता जुन्या योजनेकरीता सन २००५ मध्ये व नविन योजनेकरीता सन २०१७ मध्ये Surge Vessel यंत्रणा बसविण्यात आली आहे.

उपरोक्त दोन्ही योजनेच्या Surge Vessel यंत्रणेची वेळोवेळी दुरुस्ती करुन देखभाल करणे आवश्यक असुन देखभाल दुरुस्तीकरीता कोणताही ठेका अस्तित्वात नाही. सदर यंत्रणेच्या Spares चे दर हे मजीप्राच्या दरसुचीमध्ये उपलब्ध नसल्याकारणाने बी/२ प्रकारची ई - निविदा मागविणे योग्य होईल. सदर कामी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रु. ५.०० लक्ष व सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता ५.०० लक्ष खर्च अपेक्षित असुन " सुर्या योजना देखभाल दुरूस्ती " या लेखाशिर्षामधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामासाठी बी / २ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १०,००,००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव :-** . सन २०२१-२२, २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता वसई - विरार शहर महानगरपालिका सुर्या उद्धव (टप्पा – १ व ३) १०० द.ल.ली क्षमता योजनेच्या धुकटन जलशुध्दीकरण केंद्रामधील Surge Vessel यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे कामी बी/२ प्रकारची ई – निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १०,००,०००/- इतक्या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcoporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.:- ८२

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक :२९/०४/२०२१

प्रस्तावाचा विषय :- जाहिरात विभागातर्फे अनधिकृत व नियमबाहय होर्डिग्ज/बॅनर, इतर जाहिरातीचे साहित्य हटविणेकामी मनुष्यबळ व लागणारे यंत्रसाधनसामुग्री उपलब्ध करुन मिळणे व त्याकामी होणा-या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात विभाग मनपाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग समिती "अे ते आय" अंतर्गत येणा-या परिसरात मनपा जागेवरील अनधिकृत व नियमबाहय होर्डिग्ज/बॅनर, इतर जाहिरातीचे साहित्य हटविणेकामी मनुष्यबळ व लागणारे यंत्रसाधनसामुग्री उपलब्ध करुन नऊ प्रभाग समिती स्तरावर अनधिकृत/जाहिरात विभागामार्फत निष्कासनाचे काम करण्यात आले आहे त्याकरीता अंदाजित खर्च प्रतिदिन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रकार | अंदाजित खर्च प्रतिदिन |
|---|---|---|
| १ | गॅस कटर (०२) मनुष्यबळ व लागणारे यंत्रसाधनसामुग्री | ४०००/- |
| २ | टेम्पो | ६०००/- |
| | एकुण | १०,०००/- |

सदरील निष्कसनाच्या मोहीमेचे कामकाज करण्यास प्रतिदिन रक्कम रु. १०,०००/- प्रमाणे जाहिरात विभागातर्फे ९ प्रभाग समिती स्तरावर मनपाच्या जागेवरील अनधिकृत व नियमबाहय होर्डिग्ज/बॅनर व इतर जाहिरातीचे साहित्य निष्कसित करणेकामी गॅस कटर,मनुष्यबळ व टेम्पो यंत्रसाधनसामुग्रीसह काम करणेकामी श्री. शिवशंकर यादव (साईराम टेम्पो सर्विस) यांनी दि.२४/१/२०२१ ते दि.२६/१/२०२१ व दि.२९/१/२०२१ पर्यंत निष्कासनाची कारवाई दरम्यान लागणारे साहित्य वापरण्यात आले आहे त्याकामी रक्कम रु. २,९८,०००/-इतके देयक रक्कम अदा करणे बाकी आहे. तरी होणारी रक्कम श्री. शिवशंकर यादव (साईराम टेम्पो सर्विस) यांना अदा करणेकामी खर्चास आर्थिक, प्रशासकीय मंजुरीसाठी मा.उपआयुक्त यांचेकडे मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका जाहिरात विभागातर्फे प्रभाग समिती "ए ते आय" अंतर्गत येणा-या अनधिकृत व नियमबाहय होर्डिग्ज/बॅनर, इतर जाहिरातीचे साहित्य निष्कशित करणेकामीसाठी लागणा-या गॅसकटर,मनुष्यबळ व टेम्पो यंत्रसाधनसामुग्रीसह होणारा खर्च रक्कम रु.२,९८,०००/- रक्कमेच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदीप जोंभळे- पाटील)
उपआयुक्त(जाहिरात)
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र . ८३

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक :२८/०४/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) बाजार वॉर्ड येथिल मुख्यकार्यालयीन इमारतीवर नविन शेड उभारणे कामी मा.आयुक्त सो. हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती 'सी' बाजार वॉर्ड येथे महानगरपालिकेची मुख्य कार्यालयीन इमारत अस्तित्वात आहे.सदर इमारतीत मा.महापौर, मा.आयुक्त, अति.आयुक्त, उपआयुक्त, सहा.आयुक्त, सचिव, समिती सभागृहे, आस्थापना, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, कर भरणा केंद्र, परिवहन, मुख्य लेखा परीक्षण, वृक्षप्रधिकरण इ. अनेक विभाग कार्यरत आहेत.

सदर इमारतीत पावसाळ्यात मोठया प्रमाणात पाणी गळती होत असते. पाणीगळती झाल्याने कार्यालयीन दस्तावेज खराब होण्याची शक्यता असते तसेच अनेक दालनांत/विभागात पावसाळ्यात झालेल्या पाणीगळतीमुळे वारंवार डागडुजी करावी लागते सबब अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी हयांना मोठया त्रासाला सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी होणा-या पाणीगळतीमुळे अपघात होण्याची शक्यता देखिल नाकारता येत नाही.

मुख्य कार्यालयीन इमारतीच्या चौथ्या मजल्यावर मा.सर्वसाधारण समितीचे सभागृह असून पावसाळ्यात सभागृहात ठिकठिकाणी पाणीगळती होत असते. सभागृहाच्या भिंतीमधून पाणी झिरपून सभागृहातील वॉलपॅनल, लाकडी टप्पे, स्टेज, कारपेट, खुर्च्या इत्यादीची दुरावस्था झालेली आहे. त्याचप्रामाणे कोविड-१९ विषाणूचा संसर्ग रोखणेसाठी समाजिक अंतर राखणेच्या दृष्टीने वेळोवेळी होणाऱ्या सर्व बैठका मा.सर्व साधारण सभागृहात आयोजित करणेत येतात परंतू पाणीगळतीमुळे बैठकींच्या वेळी अधिकारी-पदाधिकारी तसेच कर्मचारी हयांना मोठया त्रासाला समोरे जावे लागते. सबब सभागृहावर शेड उभारणे आवश्यक वाटते. सदरचे काम पावसाळ्यापूर्वी करणेबाबत मा.आयुक्तांच्या तोंडी सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हा दरसुची १९-२० नुसार उपरोक्त नमूद कामासाठी रक्कम रु. ३८,८६,३३०/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून अंदाजपत्रकात brickwork,st,st.steel,G.I sheet ,guniting,rain water pipes etc इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर कामी होणारा खर्च कार्यालय व समिती सभागृह नुतनीकरण हया लेखाशिर्षातून भागविण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त नमूद कामासाठी अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) बाजार वॉर्ड येथिल मुख्यकार्यालयीन इमारतीवर नविन शेड उभारणे कामी जिल्हादर सुची १९-२०नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३८,८६,३३०/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ८४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- ३०/०४/२०२१

प्रस्तावाचा विषय:- स्वच्छ भारत अभियांन व स्मार्ट सिटी अंतर्गत कामे करण्यासाठी लागणारे संगणक, प्रिंटर व इतर साहीत्य तातडीने खरेदी करणे कामी वाटाघाटी अंती दर मंजुर करुन ठेकेदारासोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी अंतर्गत कामे करण्यासाठी लागणारे संगणक, प्रिंटर व इतर साहीत्य तातडीने खरेद करणेकामी मा. उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या मंजुरीनुसार जाहीर दरपत्रक सुचना दि.०४/११/२०२० पासून ते दि. १२/११/२०२० रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (सी), चंदनसार, दुसरा मजला, माहिती तंत्राज्ञान विभागात मागवले असता, सदर कामाबाबत ३ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यांच्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| साहित्य | नग | KALA ELECTRONICS | | K.K. INDUSTRIES | | SWARA BIO MATRIX | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति नग रक्कम | एकूण दर (सर्व करांसहीत) | प्रति नग रक्कम | एकूण दर (सर्व करांसहीत) | प्रति नग रक्कम | एकूण दर (सर्व करांसहीत) |
| संगणक संच | ६ | ४८००० | २८०००० | ५२००० | ३१२००० | ४१००० | २४६००० |
| प्रिंटर | ३ | १४२०० | ४२६०० | १४८०० | ४४४०० | १३२०० | ३९६०० |
| यु.पी.एस | ६ | २२०० | १३२०० | २२५० | १३५०० | १९०० | ११४०० |
| | | | ३४३६०० | | ३६९९०० | | **२९७०००** |

वरील प्राप्त दरांची तुलना केली असता में. SWARA BIO MATRIX या कंपनीचे दर तुलनात्मकरित्या कमी आहेत. सदर दरांमध्ये वाटाघाटी करणे कामी में. SWARA BIO MATRIX यांना जा.क्र.वविशम/मा.तं/१४९/२०-२१ दि.२२/०१/२०२१ रोजीच्या पत्राअन्वये कळविले होते. त्याअनुषंगाने SWARA BIO MATRIX यांनी सदर दरांमध्ये वाटाघाटी केली असुन सदरचा तपशिल खालील प्रमाणे.

| साहित्य | नग | SWARA BIO MATRIX | | **वाटाघाटी अंती दर** | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति नग रक्कम | एकूण दर (सर्व करांसहीत) | प्रति नग रक्कम | एकूण दर (सर्व करांसहीत) |
| संगणक संच | ६ | ४१००० | २४६००० | ३७५९९ | २२५५९४ |
| प्रिंटर | ३ | १३२०० | ३९६०० | १३१५० | ३९४५० |
| यु.पी.एस | ६ | १९०० | ११४०० | १९०० | ११४०० |
| | | | **२९७०००** | | **२७६४४४** |

तरी वरील प्रमाणे SWARA BIO MATRIX यांचे वाटाघाटी अंती दर मंजूर करुन या निविदाकाराबारोबर संविदा करणेस व कार्यादेश देणेस मंजुरीस्तव सादर.

ठराव :- स्वच्छ भारत अभियांन व स्मार्ट सिटी अंतर्गत कामे करण्यासाठी लागणारे संगणक, प्रिंटर व इतर साहीत्य तातडीने खरेद करणेकामी मे. SWARA BIO MATRIX यांचे वाटाघाटी अंती दर मंजूर करुन यांच्याशी संविदा करण्यास व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८५

विभाग :- भांडार विभाग
दिनांक :३० /०४/२०२१

**प्रस्तावाचा विषय:-** कोविड-१९ उपचार केंद्र व विलगीकरण रुग्णांकरिता पिण्याचे पाण्यासाठी आर.ओ.वॉटर फिल्टर बसविणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेने शहरामधील कोविड-१९ रुग्णांवर उपचार करण्यासाठी कोविड रुग्णांना उपचार केंद्र खालील ठिकाणी तयार केलेली आहेत.

उपलब्ध असलेले आर.ओ.वॉटर फिल्टरची क्षमता कमी असल्याने १०० लिटर व ३०० लिटर कमर्शिअल आर.ओ. लावल्यास पिण्याचे पाणी समस्या उद्भवणार नाही. त्याकरीता खालील ठिकाणी आर.ओ.वॉटर फिल्टर बसविणे आवश्यक असून मा. आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र | ठिकाण | क्षमता | आवश्यक नग | दर प्रति नग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | म्हाडा बिल्डींग क्रं. १० | ३०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | २,२०,००० | २२०००० |
| | | १००० लिटर | टँक - १ नग | १२,६०० | १२६०० |
| | | | पाईप फिटीग | ८००० | ८००० |
| | | | १००० लिटर टाकीसाठी लोखंडी स्टँड | १४००० | १४००० |
| २. | म्हाडा बिल्डींग क्रं. १४ | ५०० लिटर | टँक - १ नग | ६३०० | ६३०० |
| | | | पाईप फिटीग | ८००० | ८००० |
| | | | ५०० लिटर टाकीसाठी लोखंडी स्टँड | २५०० | २५०० |
| ३. | जूचंद्र माता बालसंगोपन केंद्र | १०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | १०५००० | १०५००० |
| | | ५०० लिटर | टँक - १ नग | ६३०० | ६३०० |
| | | | पाईप फिटीग | ८००० | ८००० |
| | | | ५०० लिटर टाकीसाठी लोखंडी स्टँड | २५०० | २५०० |
| ४. | वरुण इंडस्ट्री उपचारकेंद्र | ३०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | २,२०,००० | २२०००० |
| | | १००० लिटर | टँक - १ नग | १२,६०० | १२६०० |
| | | | पाईप फिटीग | १४००० | १४००० |
| | | | | एकूण | ६,३९,८००/- |
| | | | | १८%GST | १,१५,१६४/- |
| | | | | एकूण | ७,५४,९६४/- |

यापूर्वी कोविड-१९ पहिली लाट ओसरल्यानंतर अ.क्र.१ मधील आर.ओ. प्लांट व ५०० लिटर टँक डि.एम. पेटीट, वसई रुग्णालयात बसविण्यांत आलेली आहे. तसेच अ.क्र.३ मधील ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था नाही. व अ.क्र. ४ ठिकाणी रुग्ण संख्या जास्त असल्याने पुर्वी बसविण्यांत आलेला आर.ओ.फिल्टर प्लांट चे पाणी अपूरे पडत

आहे. रुग्णांचे पाण्यापासून हाल होऊ नये याकरिता पूर्वीचे ठेकेदार यांचे कडून तात्काळ उपरोक्त ठिकाणी आर.ओ.वॉटर फिल्टर, टँक व पाईप लाईनची ई. कामे करुन घेण्यांत आली.

तरी वरिल ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यास रक्कम रु. ७,५४,९६४/- इतका खर्च झालेला आहे. तरी उपरोक्त केंद्राचे ठिकाणी आर.ओ. वॉटर फिल्टर खरेदी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा पूरवठादार मे. रोहन नाईक यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ७,५४,९६४/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील नैसर्गिक विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

